जैवसंरक्षणाविषयी कायद्यांची थोडक्यात माहिती

# जैवविविधता कायदा २००२ व जैवविविधता नियम २००४

KALPAVRIKSH

कल्पवृक्ष

कल्पवृक्ष एन्व्हायरन्मेंट ॲक्शन ग्रुप

# जैवविविधता कायदा २००२ व जैवविविधता नियम २००४

हा कायदा जैवविविधतेचे संरक्षण, जैविक संसाधनांचा शाश्वत वापर आणि अशा वापरापासून व संबंधित ज्ञानापासून मिळणारे फायदे व त्यांची वाटणी यांविषयी आहे. हा कायदा भारतामध्ये सर्वत्र लागू आहे.

## १. या कायद्यात उपयोग केलेल्या काही महत्त्वाच्या शब्दांच्या (terms) व्याख्या काय आहेत?

**या कायद्याप्रमाणे :**

- 'जैवविविधता' याचा अर्थ जीव-जंतुंची विविधता, पर्यावरण व्यवस्थेतील विविधता, प्रजातींमधील विविधता आणि नैसर्गिक परिसंस्थांमधील विविधता.
- 'जैव संसाधने' याचा अर्थ वनस्पती, प्राणी व सूक्ष्म जीव, त्यांचे वेगवेगळे भाग, त्यांची अंतर्गत जनुकीय सामग्री व यापासून घेतलेले वा घेतले जाऊ शकणारे उत्पादन किंवा मूल्य. जैव संसाधनांच्या व्याख्येमध्ये मनुष्यप्राण्याच्या जनुकीय सामग्रीचा समावेश नाही.
- 'जैव सर्वेक्षण व जैव विनियोग' याचा अर्थ कोणत्याही उद्देशाने जीव, जाती-प्रजाती, जनुकीय सामग्री आणि जैविक संसाधनांचे भाग व त्यांचे अर्क यांचे सर्वेक्षण करणे व ते गोळा करणे. यामध्ये संसाधनांच्या विशेष लक्षणांचे वर्णन व त्यांची सूची बनविणे आणि 'बायो-ॲसे' यांचाही समावेश होतो.
- 'स्थानिक संस्था' म्हणजे ग्रामपंचायती व नगरपालिका. जिथे ग्रामपंचायती व नगरपालिका नाहीत अशा ठिकाणी लोकांनी कोणत्याही कायद्याअंतर्गत स्वयंशासन संस्था स्थापन केलेली असेल, अशा संस्थेला 'स्थानिक संस्था' म्हणतात.

---

१. ही पुस्तिका सिंबायोसिस सोसायटीच्या लॉ कॉलेज (पुणे) मधील दिव्या राधाकृष्णन व ध्रुव सिंह यांनी कल्पवृक्ष संस्थेसाठी आशिष कोठारी व नीमा पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केली.

संपादक : तेजस्विनी आपटे व एरिका तारापोरवाला

या पुस्तिकेत या कायद्याच्या मुख्य तरतूदी सोप्या शब्दांत मांडलेल्या आहेत. या कायद्याचे विश्लेषण या पुस्तिकेत समाविष्ट नाही.

## २. या कायद्यामध्ये कोणते प्राधिकरण व कोष स्थापन करण्याची तरतूद केलेली आहे?

निर्णय घेणारे गट हे पुढील तीन पातळ्यांवर स्थापन केले जातात : राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरण (नॅशनल बायोडाव्हर्सिटी अॅथॉरिटी, एन.बी.ए.), राज्य जैवविविधता बोर्ड (स्टेट बायोडाव्हर्सिटी बोर्ड, एस.बी.बी.) व गाव पातळीवर जैवविविधता व्यवस्थापन समिती (बायोडाव्हर्सिटी मॅनेजमेंट कमिटी, बी.एम.सी.). प्रत्येकाची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे :

**एन.बी.ए. (कलम ८)**

केंद्र सरकार चन्नईमध्ये एन.बी.ए. स्थापन करेल, ज्याचे सदस्य खालीलप्रमाणे असतील :

१) अध्यक्ष - एक प्रतिष्ठित व्यक्ती जिला जैवविविधतेविषयी योग्य माहिती व अनुभव आहे.

२) तीन सदस्य - एक सदस्य अनुसूचित जनजाती मंत्रालयातील असेल व दोन सदस्य पर्यावरण आणि वन मंत्रालयाचे प्रतिनिधी असतील. यांच्यातील एक वनखात्याचे अॅडिशनल डिरेक्टर जनरल (ए.डी.जी.) किंवा डिरेक्टर जनरल (डी.जी.) असले पाहिजेत.

३) सात सदस्य हे केंद्र सरकारच्या अशा मंत्रालयांचे प्रतिनिधी असावेत, जिथे पुढील विषयांवर काम केले जाते. कृषी संशोधन व शिक्षण, जैव तंत्रज्ञान, महासागर विकास, कृषी व सहकार, भारतीय औषध पद्धती व होमिओपॅथी, विज्ञान व तंत्रज्ञान, वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन.

४) सरकारी प्रतिनिधींव्यतिरिक्त पाच सदस्य.

कृषी जैवविविधता व कृषी पिकांच्या जंगली प्रजातींसंबंधित मुद्यांकडे व अन्य मुद्यांकडे लक्ष देण्यासाठी एन.बी.ए.समित्या स्थापन करू शकते. (कलम १३)

**एन.बी.ए.चे मुख्य कार्य (कलम १८) :**

१) भारतातील जैवविविधता आणि संबंधित ज्ञानाच्या (ज्यामध्ये आय.पी.आर. समाविष्ट आहे) विदेशींकडून (व्यक्ती/संस्था) होणाऱ्या वापरावर नियंत्रण ठेवणे, वापरास मंजुरी वा नकार देणे, तसेच वापरास मंजुरी देताना फायद्यांचे समान वाटप होत आहे, हे पाहणे.



२) एन.बी.ए. कडून पूर्वपरवानगी न घेता भारतातील संसाधनांवर आधारित आय. पी.आर.जर कोणी परदेशांत घेतले असतील, तर त्यांच्याविरुद्ध लढणे.

३) शासनाने परवानगी देताना घातलेल्या शर्ती पूर्ण केल्या जात नसतील किंवा नैसर्गिक संसाधनांचे नुकसान होत असेल तर दिलेली परवानगी रद्द करणे.

४) केंद्र सरकारला जैव विविधता संरक्षण व शाश्वत उपयोग आणि योग्य लाभ वितरणाविषयी सल्ला देणे.

५) जैवविविधतेच्या वेगवेगळ्या पैलूंची माहिती एकत्र करून ती प्रकाशित करणे.

६) विविध राज्यांच्या एस.बी.बी.च्या कार्यामध्ये सुसूत्रता आणणे आणि त्यांना तांत्रिक सल्ला देणे.

७) आवश्यकतेप्रमाणे राज्यसरकारांना बी.एच.एस. (बायोडाव्हर्सिटी हेरिटेज साईट) विषयी सल्ला देणे (प्रश्न ९ पहा).

**एस.बी.बी. (कलम २२)**

राज्य सरकार एस.बी.बी. स्थापन करेल. त्याचे खालीलप्रमाणे सदस्य असतील :

१) एक अध्यक्ष.

२) राज्य सरकारी विभागांतील जास्तीत जास्त पाच प्रतिनिधी.

३) संबंधित विषयांवरील तज्ज्ञांमधून नियुक्त केलेले जास्तीत जास्त पाच सदस्य.

**एस.बी.बी.चे कार्य (कलम २३)**

१) राज्य सरकारला जैवविविधता संरक्षण व शाश्वत वापर आणि योग्य लाभ वितरण यांविषयी सल्ला देणे.

२) भारतीय अर्जदारांना कोणत्याही जैविक संसाधनांचे व्यापारी उपयोग किंवा जैव सर्वेक्षण व जैव विनियोगासाठी परवानगी देणे अथवा नाकारणे.

३) इतर आवश्यक कार्य करणे.

**बी.एम.सी. (कलम ४१)**

प्रत्येक स्थानिक संस्थेला एक बी.एम.सी. स्थापन करणे अनिवार्य आहे. आपल्या परिसरामधील जैवविविधता संरक्षण व शाश्वत उपयोग, व जैवविविधता नोंदवही ठेवण्याची जबाबदारी बी.एम.सी.वर राहील. यामध्ये वन्यजीवांच्या नैसर्गिक आवास

स्थळांची सुरक्षा, कृषि जैवविविधता संरक्षण, सूक्ष्म जंतूंचे संरक्षण व जैवविविधतेशी संबंधित पारंपारिक ज्ञानाच्या नोंदीचा समावेश होतो.[२]

बी.एम.सी.मध्ये सात सदस्य असतील. त्यांपैकी कमीत कमी एक तृतीयांश महिला सदस्य आणि कमीत कमी अठरा टक्के (१८%) अनुसूचित जाती व जमातींचे प्रतिनिधी असतील.

ज्यांना व्यापारी हेतुसाठी समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये येणारी जैविक संसाधने गोळा करायची आहेत अथवा वापरायची आहेत त्यांच्याकडून बी.एम.सी. शुल्क घेऊ शकते.

एन.बी.ए. व एस.बी.बी.ला कोणत्याही संसाधनांच्या उपयोगासंबंधी निर्णय घेण्याच्या अगोदर त्या क्षेत्रातील बी.एम.सी.चा सल्ला घेणे अनिवार्य आहे.

वर दिल्याप्रमाणे राष्ट्रीय, राज्य व स्थानीय स्तरावर एक-एक जैवविविधता कोष बनविण्याची तरतूद आहे. यासाठी वेगवेगळ्या स्रोतांमधून पैसा एकत्र केला जाऊ शकतो, जो कायद्यांतर्गत दिलेल्या कार्यावर खर्च करता येतो, ज्यामध्ये स्थानिक लोकांमध्ये योग्य रूपात लाभ वितरित करणेही सामील आहे.
(खालील क्रमांक ६ पहा.)

## ३. स्थानिक जैवविविधता घटकांचा उपयोग करायचा असल्यास, त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने या कायद्यात कोणत्या तरतूदी आहेत?

संशोधन, व्यापारी उपयोग अथवा अन्य कोणत्याही उद्देशासाठी खालील श्रेणीतील व्यक्ती/संस्थांना भारतातील जैवविविधता अथवा पारंपारिक ज्ञानाचा उपयोग करायचा झाल्यास त्यांना एन.बी.ए.ची पूर्वपरवानगी घ्यावी लागते. (कलम ३) :

१) जो भारतीय नागरीक नाही.

२) अनिवासी भारतीय (आयकर अधिनियम १९६१, कलम २ मध्ये केलेल्या व्याख्येप्रमाणे)

३) अशी कंपनी, मंडळ किंवा संस्था जिची :

- भारतात रीतसर नोंदणी केलेली नसेल.

---

२. राष्ट्रीय स्तरावरच्या नियमांत म्हटले आहे की, जैवविविधतेविषयी ज्ञानाची पी.बी.आर. मध्ये नोंद करणे हे बी.एम.सी.चे प्रमुख कार्य आहे. परंतु मध्यप्रदेश, सिक्कीम, वगैरे राज्यांच्या जैवविविधताविषयक नियमांमध्ये संवर्धन, शाश्वत उपयोग आणि लाभाची वाटणी याविषयीची जबाबदारीसुद्धा बी.एम.सी.वर सोपविली आहे.



- भारतात रीतसर नोंदणी केली असेल, परंतु त्याच्या व्यवस्थापन अथवा भागभांडवलामध्ये परदेशी व्यक्ती/संस्थांचा सहभाग असेल.

***जैविक संसाधनांच्या उपयोगासाठी परवानगी मिळविण्याच्या कार्यपद्धतीचे विस्तृत वर्णन नियमांमध्ये दिले आहे.***

भारतात मिळणाऱ्या किंवा येथून उपलब्ध झालेल्या जैविक संसाधनांवर आधारित संशोधनाचे परिणाम एन.बी.ए.च्या पूर्वपरवानगीशिवाय वरील यादीतील व्यक्ती किंवा संस्थांना कळविता येणार नाहीत (कलम ४).

***अशा प्रकारच्या कोणत्याही 'तिऱ्हाईत व्यक्तीला' (थर्ड पार्टीला) माहिती देण्याची पद्धती नियमांमध्ये विस्तृत स्वरूपात दिलेली आहे.***

जर अशा उपयोगामुळे जैवविविधतेचे नुकसान होणार असेल, स्थानिक लोकांच्या उपजीविकेवर परिणाम होणार असेल किंवा अन्यप्रकारे राष्ट्रीय हितास बाधा येणार असेल, तर जैविक संसाधनांच्या वापरासाठीचा अर्ज नामंजूर केला जाऊ शकतो.

भारत आणि अन्य देशाच्या सरकारद्वारा प्रायोजित संस्थांनी सहयोगाने संशोधन केले असल्यास जैविक संसाधने आणि त्यांविषयीच्या ज्ञानाचे हस्तांतर वा देवघेव करण्यासाठी वरील तरतूदी लागू नाहीत. अशा तऱ्हेने सहयोगाने संशोधन करण्यासाठी केंद्र सरकारची मान्यता मिळविणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे ते केंद्र सरकारने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार असणे आवश्यक आहे (कलम ५).

काही जैविक संसाधने, ज्यांची नेहमी खरेदी-विक्री होते, उदा. सर्वसाधारणत: निर्यात केली जाणारी पिके, यांना वरील तरतूदींमधून केंद्र सरकार सूट देऊ शकते. यांची यादी तयार करून अधिकृत गॅझेटमध्ये प्रसिद्ध केली गेली पाहिजे तसेच व्यापारीकरणास योग्य अशा उत्पादनांचा किंवा प्रक्रियांचा विकास करण्यासाठी आयात केलेल्या संसाधनांवर संशोधन करणार नाही, असे आयातदाराने जाहीर केले पाहिजे.

## ४. भारतीयांना जैवसंसाधनांचा उपयोग करायचा असल्यास हा कायदा अशा उपयोगावर नियंत्रण कसे ठेवतो?

भारतीय नागरिक किंवा कंपनी किंवा संस्था, जिची नोंदणी भारतात झालेली असून तिच्यात परदेशी सहभाग नाही, यांपैकी कोणीही एस.बी.बी.ला प्रथम कळविल्यानंतरच कोणतीही जैविक संसाधने गोळा करून ती व्यापारी उपयोग, जैविक सर्वेक्षण किंवा जैविक विनियोगासाठी वापरू शकतात (कलम ७).

जैवविविधता संरक्षणास, शाश्वत उपयोगास किंवा लाभांची यथायोग्य वाटणी करण्यास एखादा उपक्रम असमर्थ असल्याचे एस.बी.बी.च्या निदर्शनास आले, तर स्थानिक संस्थांशी चर्चा करून व स्वत: चौकशी करून एस.बी.बी. असा उपक्रम रोखू शकतात किंवा त्यावर निर्बंध घालू शकतात (कलम २४).

जैविक संसाधनांचे उत्पादन करणाऱ्या स्थानिक लोकांना किंवा समूहांना व पारंपारिक पद्धतीने काम करणाऱ्या स्थानिक वैदूंना व हकिमांना ही तरतूद लागू नाही (कलम ७).

## ५. या कायद्याने बौद्धिक संपदा अधिकारास (इंटलेक्चुअल प्रॉपर्टी राइटस्, आय.पी.आर. पेटंट) कसे नियंत्रित केले जाते?

भारतात गोळा केलेल्या संसाधनांवर आधारित संशोधन किंवा माहिती वापरून लावलेल्या शोधासाठी भारत/परदेशात आय.पी.आर घ्यायचे झाल्यास असा अर्ज करण्यापूर्वी एन.बी.ए.ची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य आहे [कलम ६ (१)].

अशी पूर्वपरवानगी मिळविण्याच्या प्रक्रियेचे वर्णन नियमांमध्ये दिलेले आहे.

जर कोणी पेटंट किंवा इतर प्रकारच्या आय.पी.आर.साठी अर्ज केला, तर एन.बी.ए.ला तीन महिन्यांत या अर्जाबाबत निर्णय घ्यावा लागतो. अर्जदाराने सर्व शर्ती पूर्ण केल्या असल्याची खात्री पटल्यावरच एन.बी.ए. अर्जदारास आय.पी.आर. साठी अर्ज करण्यास परवानगी देते (कलम १८).

वनस्पती प्रजाती व शेतकरी अधिकार कायदा २००१[३] (प्लँट व्हरायटीज अॅन्ड फार्मर्स राईटस् अॅक्ट २००१) अंतर्गत ज्या व्यक्तींनी वनस्पती प्रजातींबाबत आय.पी.आर. साठी अर्ज केला असेल अशा व्यक्तींना या तरतूदी लागू होत नाहीत [कलम ६ (३)].

आय.पी.आर.साठी अर्ज आल्यास एन.बी.ए. चौकशी करते आणि गरज असल्यास याविषयी विचार करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करू शकते. एन.बी.ए. या समितीच्या सल्ल्याने अर्जास मंजुरी देईल अथवा नाकारेल. कोणत्याही अर्जास मंजुरी दिल्यानंतर त्याबाबत सार्वजनिक सूचना देणे एन.बी.ए.वर बंधनकारक आहे [कलम १९ (३) व (४) आणि २० (४)].

३. ज्यांचे पीक घेतले जाते अशा वनस्पतींचे, तसेच इतर वनस्पतींचे काही नवीन प्रकार विकसित करणाऱ्यांना आय.पी.आर. देता येतील, असा हा कायदा सांगतो. मात्र त्याचबरोबर अशा प्रकारच्या वनस्पतींचा उपयोग करण्याविषयी शेतकऱ्यांचे काही अधिकार या कायद्याने राखून ठेवले आहेत.



## ६. स्थानिक समुदायांबरोबर लाभाच्या वाटणीबाबत हा कायदा काय सांगतो?

जेव्हा जैवसंसाधनांचा उपयोग किंवा आय.पी.आर.ला मंजूरी दिली जाते तेव्हा अशा उपयोगापासून मिळणारा लाभ योग्य तऱ्हेने वाटला जातो आहे हे पाहण्याची जबाबदारी एन.बी.ए. किंवा एस.बी.बी.वर राहील. उपक्रमातून होणारा लाभ अर्जदार आणि 'लाभाचे दावेदार' यांच्यात वाटला जाईल. लाभाचे दावेदार म्हणजे अशा स्थानिक व्यक्तीं किंवा समुदाय, ज्यांनी त्या जैवसंसाधनांचे संवर्धन केले असेल आणि त्यांच्यावर आधारित माहिती, वहिवाट आणि नाविन्यपूर्ण उपयोग योजिले असतील. अर्जदार, संबंधित स्थानिक संस्था[४] व लाभाचे दावेदार यांच्या परस्पर सहमतीने लाभ वाटपाच्या शर्ती निश्चित केल्या जातील [कलम २१ (१)].

**लाभ वाटप खालील पद्धतीने होऊ शकते [कलम २१ (२)].**

१) आय.पी.आर.चे अर्जदार व एन.बी.ए. यांच्यातील संयुक्त अधिकाराने किंवा अर्जदार व लाभाचे दावेदार यांच्यातील संयुक्त अधिकाराने.

२) लाभाच्या दावेदारांना केलेले तंत्रज्ञानाचे हस्तांतर.

३) जेथे लाभाच्या दावेदारांचे राहणीमान सुधारेल अशा ठिकाणी संशोधन, विकास आणि उत्पादन केंद्रे उभारणे.

४) जैवसंसाधनांवर संशोधन व विकास कार्यामध्ये भारतीय वैज्ञानिक, लाभाचे दावेदार व स्थानिक लोक यांना सामील करून घेणे.

५) लाभाच्या दावेदारांच्या मदतीसाठी भांडवली निधीची[५] स्थापना करणे (व्हेंचर कॅपिटल फंड).

६) लाभाच्या दावेदारांना पैशाच्या व इतर स्वरूपात लाभ उपलब्ध करून देणे.

४. भारतीय संविधानाच्या '२४३ इ'च्या अंतर्गत कलम १ मध्ये दिल्याप्रमाणे, तसेच '२४३ ट'च्या अंतर्गत कलम १ मध्ये दिलेल्या पंचायती व नगरपालिकांच्या वर्णनाप्रमाणे : जर पंचायती वा नगरपालिका अस्तित्वात नसतील, तर स्वयंशासनाच्या अशा कोणत्याही संस्था ज्या संविधानाच्या इतर कोणत्याही तरतुदींनुसार किंवा कोणत्याही केंद्रीय कायद्याप्रमाणे किंवा कोणत्याही राज्याच्या कायद्याप्रमाणे स्थापन केलेल्या असतील.

५. नुकतेच विकसित होऊ लागलेले तंत्रज्ञान व त्यावर आधारित उद्योग यांमध्ये अशा उद्योगांच्या मालक अथवा प्रवर्तकांखेरीज इतर व्यक्ती/संस्थांनी केलेली खासगी स्वरूपाची गुंतवणूक.

ज्या व्यक्ती/संस्थांपासून जैव संसाधने अथवा त्याविषयी माहिती प्राप्त झालेली आहे अशांना एन.बी.ए. जिल्हा प्रशासनामार्फत ठरलेली रक्कम थेट देईल. परंतु जेव्हा जैविक संसाधनांची जपणूक करणारी व्यक्ती अथवा व्यक्तींचा समूह अथवा संस्था स्पष्टपणे ठरविता येत नाही, तेव्हा ही रक्कम एन.बी.एफ. (नॅशनल बायोडार्व्हसिटी फंड) मध्ये जमा केली जाईल.

## ७. कायद्यामध्ये पारंपारिक ज्ञानाच्या सुरक्षिततेसाठी कोणत्या तरतूदी आहेत ?

या कायद्याने स्थानिक लोकांच्या जैवविविधतेसंबंधीच्या ज्ञानाचा आदर करण्याची आणि त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी केंद्र सरकारवर सोपविलेली आहे [कलम ३६ (५)].

यासंदर्भात जैवविविधता नियमांमध्ये ऑगस्ट २००८ पर्यंत कोणत्याही तरतुदी केलेल्या नाहीत.

## ८. या कायद्यांतर्गत जैवविविधतेच्या संरक्षणासाठी अन्य कोणत्या तरतुदी आहेत ?

कायद्यामध्ये जैवविविधता संरक्षणाविषयी केंद्र सरकारच्या जबाबदाऱ्यांची यादी दिलेली आहे :

१) जैवविविधता संरक्षण, संवर्धन व त्यांचा शाश्वत उपयोग या उद्देशांसाठी राष्ट्रीय स्तरावर धोरण, योजना व कार्यक्रम तयार करणे. यामध्ये जैवविविधता संसाधनांनी परिपूर्ण अशी क्षेत्रे ओळखून त्यावर लक्ष ठेवणे, संसाधनांचे त्यांच्या क्षेत्रात किंवा बाहेर संवर्धन करणे व जैवविविधतेच्या विषयाबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी संशोधन, प्रशिक्षण व लोकशिक्षण यांना प्रोत्साहन देणे [कलम ३६ (१)].

२) ज्या क्षेत्रामध्ये जैवविविधता असुरक्षित आहे, अशा क्षेत्रामध्ये राज्य सरकारला योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश देणे [कलम ३६ (२)].

३) ज्या योजनांच्या जैवविविधतेवर दुष्परिणाम होण्याची शक्यता आहे अशा योजनांचा पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचा अंदाज घेणे [कलम ३६ (४) (१)].



***यासंदर्भात जैवविविधता नियमांमध्ये ऑगस्ट २००८ पर्यंत कोणत्याही तरतूदी केलेल्या नाहीत.***[६]

४) जैवतंत्रज्ञानाचा वापर करून जनुकीय बदल केलेले जीव (जेनेटिकली मॉडिफाइड ऑर्गनिझम्स, जी.एम.ओ.) मोकळे केल्यामुळे मानवी स्वास्थ्याला आणि जैवविविधतेला संभविणाऱ्या धोक्यांवर नियंत्रण ठेवणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे [कलम ३६ (४) (२)].

***यासंदर्भात जैवविविधता नियमांमध्ये ऑगस्ट २००८ पर्यंत कोणत्याही तरतूदी केलेल्या नाहीत.***[७]

५) ज्या प्रजाती लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत, त्यांना 'संकटग्रस्त प्रजाती' घोषित करणे आणि त्या गोळा करण्यावर नियंत्रण ठेवणे किंवा प्रतिबंध करणे, आणि या जाती-प्रजातींची पुनर्स्थापना करण्यासाठी व सुरक्षिततेसाठी प्रयत्न करणे. संबंधित राज्य सरकारशी याबाबत सल्लामसलत करणे (कलम ३८).

***एखाद्या प्रजातीला संकटग्रस्त म्हणून घोषित करण्यासाठीची प्रक्रिया जैवविविधता नियमांमध्ये दिलेली आहे.***

६) एन.बी.ए. च्या सल्ल्याने संस्थांना वेगवेगळ्या श्रेणीतील जैवसंसाधनांची 'संग्रह संस्था' घोषित करणे. या संग्रह संस्था जैविक सामग्रीस सुरक्षित ठेवतील. कोणीही नवीन जाती, प्रजाती किंवा इतर प्रकारचा शोध लावल्यास त्याने संग्रह संस्थांना ही माहिती देणे आवश्यक आहे आणि संस्थेत त्या जाती-प्रजातींचे नमुने जमा करणे आवश्यक आहे (कलम ३९).

***वेगवेगळ्या प्रकारच्या जैविक संसाधनांसाठी संग्रह संस्था नियुक्त करण्याची प्रक्रिया नियमांमध्ये दिलेली आहे.***

## ९. बायोडायव्हर्सिटी हेरिटेज साईटस् (बी.एच.एस.) म्हणजे काय ?

बी.एच.एस. म्हणजे जैवविविधतेचा विशेष वारसा लाभलेली क्षेत्रे. जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण क्षेत्रांबाबत स्थानिक संस्थांशी सल्लामसलत करून राज्य सरकार अशी

---

६. पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ (इ.पी.ए. १९८६) साठी जाहीर केलेल्या संबंधित अधिसूचनांद्वारा सध्या यांवर नियंत्रण ठेवले जाते.

७. पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ (इ.पी.ए. १९८६) साठी जाहीर केलेल्या जी.एम.ओ. (गुणसूत्रांत बदल घडविलेले जीव) विषयीच्या अधिसूचनेद्वारा सध्या यांवर नियंत्रण ठेवले जाते.

क्षेत्रे बी.एच.एस. म्हणून घोषित करू शकते. केंद्र सरकारशी सल्लामसलत करून राज्य सरकार अशा क्षेत्रांचे संरक्षण व व्यवस्थापन यासाठी नियम करेल आणि अशा घोषणेमुळे ज्या लोकांचे आर्थिक नुकसान होत असेल त्यांच्यासाठी नुकसानभरपाई किंवा पुनर्वसनाच्या योजना आखेल (कलम ३७).

***यासंदर्भात जैवविविधता नियमांमध्ये ऑगस्ट २००८ पर्यंत कोणत्याही तरतूदी केलेल्या नाहीत.***

## १०. वाद/मतभेद मिटविण्याच्या कोणत्या तरतूदी कायद्यामध्ये केलेल्या आहेत?

एन.बी.ए. व एस.बी.बी. यांच्यामध्ये वाद निर्माण झाल्यास ते केंद्र सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयातील सचिवांकडे, फॉर्म ५ द्वारा अपील करू शकतात. कोणत्याही दोन एस.बी.बी. यांच्यात वाद निर्माण झाल्यास केंद्र सरकार हा वाद एन.बी.ए.कडे सोपविते (कलम ५०).

कोणत्याही व्यक्तीला एस.बी.बी. किंवा एन.बी.ए. यांनी दिलेला निर्णय मान्य नसल्यास निर्णय कळविल्यापासून तीस दिवसांच्या आत अशी व्यक्ती उच्च न्यायालयात अपील करू शकते (कलम ५२).

***बी.एम.सी.च्या संदर्भात अशी कोणतीही तरतूद केलेली नाही.***

जैवसंरक्षणाविषयी कायद्यांची थोडक्यात माहिती

**जैवविविधता कायदा २००२ व**

**जैवविविधता नियम २००४**

**प्रकाशक** : 'कल्पवृक्ष' फ्लॅट नं ५, श्री दत्त कृपा,
९०८ डेक्कन जिमखांना, पुणे - ४११००४.

**फोन** : ९१-२०-२५६७५४५०

**फॅक्स** : ९१-२०-२५६५४२३९

**ईमेल** : kvoutreach@gmail.com

**वेबसाईट** : www.kalpavriksh.org

**डिझाईन** : मधुवंती अनंतराजन

**अनुवाद/भाषांतर** : अनुराधा अर्जुनवाडकर, उज्वला नलावडे

**निधी** : मिझेरिऑर, आखेन, जर्मनी